# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 21/01/2020 (मंगळवार)
## (सकाळ)

---

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 28 कि.मी अंतरावर सिलीकॉन व्हिल्य, लॉन ॲन्ड रेस्टोरेन्ट खेडी येथे दिनांक 19/01/2020 चे 20:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मोनाली आशिष वैकुंठी, वय 32 वर्ष, रा. श्री. कृष्णा नगर, जि. नागपूर या त्यांचे पती नामे– आशिष वैकुंठी यांच्या सोबत एमएच–40/डी–6683 क्रमांकाची टिव्हीएस मोटरसायकलने कार्यक्रमाला गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची 5,000/– रू. किंमतीची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काळे 9822549695 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत बुटीबोरी टाऊन येथे दिनांक 11/01/2020 चे 22.30 वा. दरम्यान 24 वर्षीय फिर्यादी यांचा फेसबुक अकाउंट अज्ञात आरोपीने हॅक केले. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या नावाचा फेसबुक अकाउंट तयार करून फिर्यादींचे फेसबुक अकाऊट वरील फोटो मिळवून ते फेसबुक अकाऊंट प्रोफाईल मध्ये वापरून फेसबुकचा वापर केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी विरुध्द कलम 66(ई), 66(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री शेख हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर